**ठळक बातम्या**

राज्यात अवकाळी पावसाचा फटका बसलेल्या अडीच लाख शेतकऱ्यांना ३३४ कोटी रुपये नुकसान भरपाई देण्याबाबतचा शासन आदेश जारी

जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या दरातली घसरण कायम

नसरापूर बालिका अत्याचार आणि हत्येप्रकरणी आरोपी भीमराव कांबळे दोषी, शिक्षा येत्या सोमवारी सुनावणार

**आणि**

व्हेनेझुएलात झालेल्या शक्तिशाली भूकंपामुळे मरण पावलेल्यांची संख्या १६४ वर, ९७१ जण जखमी

**<><><><><>**

महाराष्ट्रात अवकाळी पावसाचा फटका बसलेल्या अडीच लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांना ३३४ कोटी रुपयांहून अधिक रकमेची नुकसान भरपाई देण्याचा शासन आदेश राज्य सरकारनं आज जारी केला. गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरपासून यंदाच्या मे महिन्यापर्यंत झालेल्या अवकाळी पावसानं नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ही आर्थिक मदत जमा होणार आहे. यात कोकणातल्या आंबा आणि काजू पीकाचं नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठीच्या २०९ कोटी रुपयांच्या नुकसान भरपाईचाही समावेश आहे. कोकणातल्या १ लाख ३४ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना ही रक्कम मिळेल. नागपूर, वर्धा, चंद्रपूर, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, अहिल्यानगर, ठाणे, सिंधुदुर्ग, कोल्हापूरमधल्या शेतकऱ्यांच्या गेल्या २ महिन्यात अवकाळीमुळे झालेल्या नुकसानीपोटी मंजूर झालेल्या १०६ कोटी रुपयांच्या मदतीचा यात समावेश आहे. ९५ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे. याशिवाय विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातल्या काही जिल्ह्यांमधल्या शेतकऱ्यांनाही या मदतीचा लाभ मिळणार आहे.

ही रक्कम येत्या ८-१० दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, असं आश्वासन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज विधानसभेत दिलं . याशिवाय कोकणातल्या सुमारे ७२

हजार शेतकऱ्यांना पीक विम्याचे २१७ कोटी रुपये येत्या १५ दिवसांत दिले जातील, असं आश्वासन देखील कृषिमंत्र्यांनी दिलं आहे.

<><><><><>

जागतिक बाजारात कच्च्या तेलांच्या किमतीतली घसरण आजही कायम राहिली. ब्रेंट क्रूडचे दर ९ शतांश टक्क्यांनी घसरून प्रतिबॅरल ७३ अमेरिकन डॉलर्स आणि ६ सेंट्सवर व्यवहार करत होते. तसंच वेस्ट टेक्सास इंटरमीजिएट क्रूडचे दरही ८ शतांश टक्क्यांपेक्षा जास्त घसरणीसह प्रतिबॅरल ६९ अमेरिकन डॉलर्स आणि ७४ सेंट्सवर व्यवहार करत होते.

<><><><><>

अयोध्येच्या श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासाला मिळालेल्या देणग्यांचा अपहार झाल्याचा आरोप करणाऱ्या आणि याप्रकरणी चौकशीचे आदेश द्यावे अशी मागणी करणाऱ्या याचिकेची तातडीनं सुनावणी घ्यायला सर्वोच्च न्यायालयानं आज नकार दिला. मात्र येत्या सोमवारी क्रमानुसार याचिका सादर करावी असं न्यायमूर्ती बी.व्ही नागरत्ना आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी सांगितलं. न्यासाला मिळालेल्या देणग्यांसंदर्भात सीसीटीव्ही फूटेज, डिजिटल पेमेंटच्या नोंदी, आणि इतर सर्व प्रकारचे पुरावे जतन करावे अशी मागणी याचिकाकर्ते वकील नरेंद्र कुमार गोस्वामी यांनी केली आहे.

<><><><><>

आज संविधान हत्या दिवस पाळला जात आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आणीबाणीचा विरोध करणाऱ्या मान्यवरांना वंदन केलं आहे. आणीबाणीच्या काळात भारतीय नागरिकांचं धैर्य दिसून आलं, आजही भारत न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वांशी बांधील असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे. आणीबाणीबाबत माजी प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या एका कवितेची आठवण त्यांनी करुन दिली…

**होल्ड -बाईट - प्रधानमंत्री**

१९७५ मध्ये आजच्या दिवशी देशात आणीबाणी लागू करण्यात आली होती. त्या घटनेचं स्मरण म्हणून आजचा दिवस पाळला जातो. आणीबाणीच्या काळात देशासाठी प्राण गमावलेल्या व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी तसंच संविधानाचं आणि लोकशाहीचं मूल्य नागारिकांना समजावं यासाठी आज देशभरात आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं.

**<><><><><>**

रेल्वे मालवाहतुकीचं आधुनिकीकरण करण्याच्या दृष्टीनं रेल्वेमंत्री अश्विनि वैष्णव यांनी आज नवी दिल्ली इथं एक आढावा बैठक घेतली. विविध वस्तूंचं आकारमान आणि वैशिष्ट्यांनुसार मालगाडीच्या वाघिणींची रचना करावी असा प्रस्ताव या बैठकीत पुढं आला आहे. मीठ आणि सिमेंट अशा वस्तूंसाठी मुद्दाम तयार करण्यात आलेल्या वाघिणींचं आरेखन या बैठकीत सादर करुन त्याच्या सफलतेविषयी चर्चा झाली.

**<><><><><>**

नसरापूर मधे अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करुन तिची हत्या केल्याबद्दल आरोपी भीमराव कांबळे याला विशेष न्यायालयाने दोषी ठरवलं आहे. आरोपीच्या शिक्षेबाबतचा निवाडा न्यायालय येत्या सोमवारी देणार आहे. आरोपीवर दाखल सर्व गुन्हे सिद्ध झाल्याचं न्यायालयाने म्हटलं आहे. गेल्या १ मे रोजी घडलेल्या या गुन्ह्याचा तपास पूर्ण होऊन ५५ दिवसात खटल्याचा निकाल लागला आहे.

**<><><><><>**

व्हेनेझुएलात झालेल्या शक्तिशाली भूकंपामुळे झालेल्या दुर्घटनांमधे मरण पावलेल्यांची संख्या १६४ झाली असून ९७१ जण जखमी झाले आहेत. व्हेनेझुएलाच्या हंगामी अध्यक्ष डेल्सी रॉड्रिग्ज यांनी ही माहिती दिली. काल मध्यरात्रीनंतर साडेसात आणि सात पूर्णांक २ दशांश रिक्टर तीव्रतेचे धक्के तिथं जाणवले. गेल्या १०० वर्षात एवढ्या तीव्रतेचा भूकंप या परिसरात कधी झालेला नाही. धक्क्यांचा प्रभाव सुमारे सतराशे किलोमीटर दूरपर्यंत ब्राझिलमधे ॲमेझॉनपर्यंत जाणवल्यानं घाबरुन रहिवाशांनी इमारती रिकाम्या केल्या. देशात आणीबाणी घोषित केली असून मदत आणि बचावकार्य वेगाने सुरु आहे.

अत्यावश्यक सेवा वगळता इतर कामकाज बंद ठेवलं आहे. जखमींच्या आणि मृतांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे.

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन् आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. संकटाच्या या काळात भारत व्हेनेझुएलाच्या पाठीशी असल्याचं दोन्ही नेत्यांनी सांत्वनपर संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं व्यवसायिक एलपीजी पुरवठ्यावरचे सर्व निर्बंध हटवले असून पश्चिम आशियातल्या संकटापूर्वीच्या स्तरावरचा पुरवठा पुन्हा सुरु केला आहे. यामुळे औद्योगिक आणि व्यवसायिक एलपीजी ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. संकट सुरु झाल्यानंतर थांबवण्यात आलेला बल्क एलपीजी पुरवठ्यावरचेही निर्बंध कमी करून त्याचा पुरवठा संकटापूर्वीच्या वापराच्या ५० टक्क्यांवर आणला आहे.

<><><><>

संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने तयार केलेल्या नेत्रा या स्वदेशी बनावटीच्या हवाई हल्ला इशारा आणि नियंत्रण यंत्रणेला अंतिम परिचालन मंजुरी मिळाली आहे. बंगळुरू इथं आज झालेल्या एका समारंभात भारतीय वायुदलाचे उपप्रमुख एअर मार्शल अवधेश कुमार भारती यांना ही मंजुरी सुपूर्द करण्यात आली. नेत्रा सारख स्वदेशी तंत्रज्ञान ऑपरेशन सिंदूर आणि बालाकोट हल्ल्याच्या वेळी उपलब्ध झाल्यामुळे देशाच्या संरक्षण सिद्धतेत मोठी वाढ झाल्याचं यावेळी वायुदल उपप्रमुखांनी सांगितलं.

<><><><>

होर्मूझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या जहाजांनी इराणच्या आयआरजीसी ने अधिकृत रित्या नेमून दिलेल्या मार्गानेच प्रवास करावा, इतर मार्गांनी प्रवास केल्यास ते धोकादायक ठरू शकते अशी सूचना इराणी अधिकाऱ्यांनी दिली आहे. इराणच्या अधिकृत वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केलेल्या एका पत्रकात ही माहिती दिली आहे. आंतरराष्ट्रीय सागरी संस्थेशी झालेल्या करारानुसार इराणी अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सुचनामध्ये याचा समावेश आहे.

यापुढच्या काळात होर्मूझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या जहाज प्रवासाचं व्यवस्थापन करण्यासाठी इराण आणि ओमान ने संयुक्त कृतीदल स्थापन करण्याचे ठरवलं आहे आणि त्या अर्थाचं संयुक्त निवेदन दोन्ही देशांनी आज जारी केलं आहे.

होर्मूझमध्ये अडकून पडलेल्या ११ हजार खलाशांच्या सुटकेसाठी सर्व सुरक्षा परवान्यांसहित हमी योजना तयार केली असल्याचं आंतरराष्ट्रीय सागरी संस्थेच्या अध्यक्षांनी सांगितलं आहे.

<><><><>

महिलांच्या टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज मॅनचेस्टर इथं भारत आणि बांगलादेश यांच्यात सामना सुरु आहे. बांगलादेशानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र त्यांची सुरुवात खराब झाली. दुसऱ्याच षटकात संघाची धावसंख्या ८ असताना दिलारा अख्तर ४ धावांवर बाद झाली.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा बांगलादेशाच्या १७ व्या षटकात ४ बाद १०७ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज संसद भवनात राज्यसभेच्या १० नवनिर्वाचित आणि पुनर्निर्वाचित सदस्यांना शपथ दिली. यामध्ये आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, कर्नाटक, गुजरात, आणि झारखंडमधल्या सदस्यांचा समावेश आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी २७ ते २९ जून दरम्यान सेशल्स या देशाच्या दौऱ्यावर जाणार आहेत. ते सेशल्सच्या राष्ट्रीय दिनाच्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

//<><><><><>//